सन २०२६-२७ करिता लेखाशीर्ष २२४५ २१९४ व लेखाशीर्ष २२४५ २३८१ अंतर्गत उणे (-) प्राधिकार पत्रावर कोषागारातून रक्कम आहरित करण्याकरिता प्राधिकृत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

मदत व पुनर्वसन विभाग

शासन निर्णय क्र एससीवाय-२०२६/प्र.क्र.५०/मदत-३

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक

मंत्रालय,मुंबई-४०००३२.

दिनांक:-१३ ऑगस्ट, २०२६

वाचा : १. महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र. सीएलएस-२०२३/प्र.क्र.१६८/म-३, दि.२८.७.२०२३.

२. मदत व पुनर्वसन विभाग, शासन निर्णय क्र. सीएलएस-२०२६/प्र.क्र.३२२/मदत-१(म-३), दि.०३.०८.२०२६.

प्रस्तावना :-

अतिवृष्टी व पूर या नैसर्गिक आपत्तींमध्ये आपदग्रस्तांच्या कपड्यांच्या व घरगुती भांडी/वस्तू यांच्या झालेल्या नुकसानीकरिता व दुकानदार व टपरीधारकांच्या झालेल्या नुकसानीकरिता विशेष/वाढीव दराने मदत करण्यास संदर्भाधीन दि.२८.७.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आलेली आहे. बाधित कुटुंबांना घरगुती भांडी, वस्तू आणि कपड्यांसाठी तसेच दुकानदार व टपरीधारकांना विशेष/वाढीव दराने देण्यात येणाऱ्या मदतीस सन २०२४-२५ व सन २०२५-२६ या वित्तीय वर्षाकरिता देखील मुदतवाढ देण्यात आलेली होती. त्याचप्रमाणे सन २०२६-२७ या वित्तीय वर्षाकरिता मुदतवाढ देऊन कपड्यांच्या व घरगुती भांडी/वस्तू यांच्या नुकसानीकरिता लेखाशीर्ष २२४५ २१९४ व दुकानदार व टपरीधारकांच्या झालेल्या नुकसानीकरिता लेखाशीर्ष २२४५ २३८१ अंतर्गत उणे (-) प्राधिकार पत्रावर कोषागारातून रक्कम आहरित करण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

सन २०२६-२७ या वित्तीय वर्षात नैसर्गिक आपत्तींमध्ये आपदग्रस्तांच्या कपड्यांच्या व घरगुती भांडी/वस्तू यांच्या झालेल्या नुकसानीकरिता विशेष/वाढीव दराने करावयाच्या मदतीचे वाटप तातडीने व्हावे, याकरिता मागणी क्र.सी-६; मुख्य लेखाशीर्ष २२४५, नैसर्गिक आपत्तींच्या निवारणासाठी सहाय्य; ०२ पूर, चक्रीवादळे इ.; १०१, अनुग्रह सहाय्य; (९२) राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या मानकांव्यतिरिक्त खर्च; (९२) (०१) रोख भत्ता, मृत व्यक्तींच्या कुटुंबियांना सहाय्य व जखमींना मदत (अनिवार्य); ३१ सहायक अनुदाने (वेतनेतर) (सशर्त) (२२४५ २१९४) या लेखाशीर्षांतर्गत देयके अदा करण्याकरिता जिल्हाधिकारी यांना उणे (-) प्राधिकार पत्रावर कोषागारातून रक्कम आहरित करण्यासाठी प्राधिकृत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

तसेच दुकानदार व टपरीधारकांच्या झालेल्या नुकसानीकरिता विशेष/वाढीव दराने करावयाच्या मदतीचे वाटपदेखील तातडीने व्हावे, याकरिता मागणी क्र.सी-६; मुख्य लेखाशीर्ष २२४५, नैसर्गिक आपत्तींच्या निवारणासाठी सहाय्य; ०२, पूर, चक्रीवादळे इ.; ११९, हानी पोहोचलेली हत्यारे व साधनसामग्री यांची दुरुस्ती/ती नव्याने पुरविणे यासाठी कारागिरांना सहाय्य; (९२) राज्य

आपत्ती प्रतिसाद निधीच्या मानकांव्यतिरिक्त खर्च; (९२) (०१) हानी पोहोचलेली हत्यारे व साधनसामग्री यांची दुरुस्ती/ती नव्याने पुरविणे तसेच कच्च्या प्रक्रियाधीन व तयार करावयाच्या मालाच्या नुकसानीसाठी कारागिरांना सहाय्य (अनिवार्य); ३१, सहायक अनुदाने (वेतनेतर) (२२४५ २३८१) या लेखाशीर्षांतर्गत देयके अदा करण्याकरिता उणे (-) प्राधिकार पत्रावर कोषागारातून रक्कम आहरित करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. नैसर्गिक आपत्तींमध्ये आपदग्रस्तांच्या कपड्यांच्या व घरगुती भांडी/वस्तू तसेच, दुकानदार व टपरीधारकांच्या यांच्या झालेल्या नुकसानीकरिता विशेष/वाढीव दराने द्यावयाची मदत वाचा क्र. १ येथील नमूद दि.२८.०७.२०२३ च्या शासन निर्णयानुसार देण्यात यावी.

तथापि, पालघर जिल्हा व वसई-विरार महानगरपालिका क्षेत्रात माहे जुलै, २०२६ मध्ये झालेल्या अतिवृष्टी व ढगफुटी सदृश्य पावसामुळे झालेल्या नुकसानीकरिता क्र. सीएलएस-२०२६/ प्र.क्र.३२२/मदत-१(म-३), दि.०३.०८.२०२६ अन्वये विशेष पॅकेज मंजूर केले आहे.

३. उणे प्राधिकार पत्रावर निधी वितरीत करताना संबंधित अधिकारी यांनी उक्त बाबींचे पंचनामे झाले असल्याची खातरजमा करून निधी वितरीत करावा.

४. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र.४३५/२०२६/व्यय-९, दि.०४.०८.२०२६ अन्वये मिळालेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०८१३१५४६०५५९४१ असा आहे. सदर शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

VINAY PANDURANG LOKHANDE

Digitally signed by VINAY PANDURANG LOKHANDE
DN: c=IN, 2.5.4.97=OFN:GOVERNMENT OF MAHARASHTRA, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Relief and Rehabilitation, 2.5.4.20=EEDFE3322D40AD245C8F52370F8D8B4D8B94B560A370AEAF4D3AA33C9369DE3A, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=889A1BA1DD6F599D5354C2F03ECDBB310A43140A80414FAD46DF22CBD7755A8F, cn=VINAY PANDURANG LOKHANDE
Date: 2026.08.13 15:47:31 +05'30'

(विनय लोखंडे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
२. मा.उप मुख्यमंत्री (नगरविकास, गृहनिर्माण , सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रमासह)) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा. उप मुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क, क्रिडा व युवक कल्याण, अल्पसंख्याक विकास व औकाफ़ विभाग) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा. मंत्री (मदत व पुनर्वसन विभाग) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा. मंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६. मा. राज्यमंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
७. विधान मंडळाचे सर्व सन्माननीय सदस्य
८. अपर मुख्य सचिव (वित्त), मंत्रालय, मुंबई
९. सर्व विभागीय आयुक्त
१०.सर्व जिल्हाधिकारी
११.संचालक, आपत्ती व्यवस्थापन, मंत्रालय, मुंबई.
१२.मा.महालेखापाल -१/२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई / नागपूर
१३.मा.महालेखापाल -१/२ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई / नागपूर
१४.संचालक, लेखा व कोषागरे, मंत्रालय, मुंबई

१५.अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
१६.सर्व जिल्हा कोषागर अधिकारी
१७.वित्त विभाग (व्यय-९/अर्थ-६),मंत्रालय, मुंबई
१८. उप सचिव, (ब-१/२), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
१९. अवर सचिव, मदत-१, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
२०. निवडनस्ती (मदत-३)